ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग अर्थशास्त्र, व्यापार सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ३० मार्च, १९६० | अंक १३

## विविध माहिती

**गुजरातची नवी राजधानी** —गुजरातची नवी राजधानी अहमदाबादच्या उत्तरेला १५ मैलांवर बसविण्यांत येणार असून तिला गांधीनगर असें नांव देण्यांत येणार आहे. राजधानीचा विस्तार ११५ चौरस मैलांवर पसरणार आहे. अहमदाबादच्या म्युनिसिपल कमिशनरनीं राजधानीच्या बांधणीची योजना आंखली आहे. बांधणी पुरी होण्यास दोन वर्षें लागतील.

**तिबेटच्या निराश्रितांना आ[illegible]** —तिबेटमधील राजकीय परिस्थितीला कंटाळून ७५० तिबेटी नागरिकांनीं गेल्या वर्षी भारताचा आश्रय घेतला. ह्या निर्वासितांची आतां लडाखमध्यें वसाहत स्थापन करण्यांत येणार आहे. निर्वासितांसाठी उभारण्यांत आलेल्या तात्[illegible]या छावणींत त्यांना जम्मू येथें ठेवण्यांत आले आहे. त्यांना रस्त्याच्या कामावर रोजगार दिला जाईल.

**प्रत्येक राज्यांत एक हायकोर्ट** — सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश श्री. भुवनेश्वर सिन्हा ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं प्रत्येक राज्यांत त्या राज्यासाठी एकाच ठिकाणीं हायकोर्ट असावें; निरनिराळया ठिकाणीं बेंचेस ठेवण्यापेक्षा ह्या पद्धतीनें न्यायदानाच्या अधिक चांगल्या प्रथा पडतील असें त्यांना वाटतें.

**अणुशक्तीच्या साह्यानें वीज** — अमेरिकेच्या अणुशक्ति कमिशनचें एक मंडळ भारताचा दौरा करून गेलें. भारतांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करण्याबाबत व अणुशक्तीचे इतर उपयोग करण्याबाबत मंडळानें भारत सरकारला सहकार्य देण्यासंबंधीं उभय पक्षांत विचार करण्यांत आला.

**पोस्ट खात्याचे फॉर्म्स**—पोस्ट व तारखात्याच्या कांहीं फॉर्म्सवर, विशेषतः परदेशांत जाणाऱ्या फॉर्म्सवर, अजूनहि 'ब्रिटिश इंडिआ', असें छापण्यांत आल्याचे लोकसभेंत वहातूक व दळणवळण खात्याच्या मंत्र्यांनीं कबूल केलें. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १९५७ मध्यें छापण्यांत आलेल्या कांहीं फॉर्म्सवरहि वरील शब्द आढळून आले. अशा तऱ्हेच्या चुका न करण्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यांत आलें आहे.

**डॉक्टर विश्वेश्वर अय्या ह्यांची शताब्दी**— सुप्रसिद्ध भारतीय एंजिनिअर डॉ. विश्वेश्वर अय्या ह्यांची शताब्दी येत्या सप्टेंबर महिन्यांत साजरी करण्यांत येणार आहे. ह्या प्रसंगाच्या निमित्तानें एक औद्योगिक वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याचें शताब्दी समितीनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी २५ लाख रुपयांचा निधि जमविण्यांत येत आहे.

**तंत्रविज्ञानाची शिक्षणसंस्था**—मद्रास राज्यांतील गिंडी येथें स्थापन करण्यांत येणाऱ्या तंत्रविज्ञान शिक्षण-संस्थेचे डायरेक्टर श्री. सेनगुप्ता पश्चिम जर्मनीच्या दौऱ्यावर गेले आहेत. तेथील अशा प्रकारच्या संस्थांचा ते अभ्यास करणार आहेत. ह्या संस्थेसाठी पश्चिम जर्मनीचें सरकार १८ कोटी रुपयांचीं साधनें पुरविणार आहे.

**भारतासाठी इजिप्तचा तांदूळ**—भारत व इजिप्त ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें इजिप्त भारताला १ लाख टन तांदूळ पुरविणार आहे. उलट भारत इजिप्तला तागाचा माल, चहा, सायकली विजेचे पंखे, इत्यादि माल विकणार आहे. ह्या कराराप्रमाणें इजिप्त तांदुळाची किंमत रुपयांत घेणार आहे. त्यामुळें परदेशीय चलनाची अडचण येणार नाहीं.

**पॅरीसमधील प्रदर्शन**—भारतीय संस्कृतीमधील कलावस्तूंचें एक प्रदर्शन पॅरीसमध्यें पुढील महिन्याच्या प्रारंभीं उघडण्यांत येणार आहे. भारतामधील ५,००० वर्षांपूर्वीच्या मोहेंजोदारो संस्कृतीपासून तों तहत आजपर्यंतच्या कलाकृतींचे नमुने प्रदर्शनांत मांडण्यांत येणार आहेत. मोहेंजोदारो संस्कृतीचे आणखी कांहीं अवशेष नुकतेच गुजरातमध्यें सांपडले आहेत.

**उर्दू-रशिअन शब्दकोश** - श्री. झेड. अनसारी ह्या गृहस्थानी रशिअन-उर्दू शब्दकोश तयार केला आहे. ह्या शब्दकोशांत २५,००० शब्द आहे. शब्दकोशाची एक प्रत राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांना देण्यांत आली. श्री. अनसारी सध्यां मॉस्कोंत असून ते वाक्यप्रचार व म्हणी ह्यांचा असाच एक कोश तयार करीत आहेत.

**तेलाच्या शोधासाठी मदत**—भूमिगत तेलाचा शोध करण्याच्या कामीं भारत सरकार ज्या सवलती देण्यास तयार आहे त्यांची माहिती गेल्या नोव्हेंबरमध्यें प्रसिद्ध करण्यांत आली. तेव्हांपासून बऱ्याच परदेशी कंपन्यांनीं ह्या बाबतींत सरकारकडे विचारणा केल्या आहेत. तथापि परदेशी कंपन्यांना ज्या भागांत संशोधन करूं द्यावयाचें, ते भाग अद्याप निश्चित करण्यांत आलेले नाहींत.

**हिवतापाच्या साथीचे बळी**—मध्य जाव्हांत गेल्या ऑक्टोबरमध्यें हिवतापाची साथ फार मोठ्या प्रमाणावर पसरली होती. ह्या साथींत ६,००० लोक दगावले असावेत असा अंदाज आहे. जाव्हाच्या उत्तरेकडील किनाऱ्याच्या भागांत अजूनहि साथीचा जोर आहे. ह्या भागांत राहणाऱ्या ४० लाख लोकांना साथीचा धोका उत्पन्न झाला आहे.

## नव्या औद्योगिक कारखान्यांस मंजुरी

### काहीं स्थूल तत्त्वें

मध्यवर्ति व्यापार आणि उद्योग खात्यानें देशांतील नवीन औद्योगिक कारखान्यांस मंजुरी देण्याबाबत काहीं स्थूल तत्त्वें ठरवून दिलेलीं आहेत. सरकारकडून मंजुरी घेण्याची जरूरी असलेल्या प्रकरणांचा निर्णय त्वरित लावतां यावा याच दृष्टीनें ही व्यवस्था करण्यांत आली असून तसे महत्त्वाच्या व्यापारी संस्थांना आणि चेम्बर्स ऑफ कॉमर्सना कळविण्यांत आलें आहे.

नवीन औद्योगिक योजनांस सदर खात्याकडून पुढील तीन गोष्टींच्या बाबतींत मंजुरीची आवश्यकता असते. (१) अशा योजनेंत परदेशीय फर्मचें सहकार्य संकल्पित असल्यास त्याबाबतच्या काहीं अटी असल्यास, त्यांस मंजुरी (२) परवाना समितीनें विचार केल्यानंतर योजनेची उत्पादन शक्ति, जागा इ. बाबत द्यावयाची मंजुरी आणि (३) परदेशांतून यंत्रसामग्रीची आयात करण्यासाठी परकीय चलनांत लागणाऱ्या खर्चास मंजुरी.

परदेशीय फर्मशीं तांत्रिक सहकार्य किंवा भांडवल गुंतवणूक यासंबंधांत केलेल्या अटींसंबंधांत अशा प्रत्येक प्रकरणाची त्यांच्या गुणवत्तेनुसार तपासणी करण्याची गरज आवर्जून सांगण्याची आवश्यकता नाहीं. तथापि तांत्रिक सहकार्य घेण्याची मुदत शक्यतों दहा वर्षांपेक्षा अधिक नसावी. या फर्मशीं केलेल्या करारांत निर्यातीसंबंधांत तसेंच आयातीबाबत फारसे निर्बंध असूं नयेत. या परदेशीय फर्मला रॉयल्टी ठरवून न देतां अशा योजनेच्या होणाऱ्या उलाढालीनुसार द्यावयाच्या पैशाचें प्रमाण ठरवावें. कारखान्याची उत्पादनशक्ति, ठिकाण इ. संबंधांतहि अर्जांचा त्वरित निर्णय लावण्यासाठी अनेक उपाय योजण्यांत आले आहेत. १०० पेक्षा कमी कामगार लागणाऱ्या आणि एकूण मालमत्ता १० लक्ष रुपयांपेक्षा कमी असलेल्या उद्योगधंद्यांना परवाना काढण्याची जरूरी नाहीं असा निर्णय अलीकडेच सरकारनें घेतला आहे. मर्यादित परकीय चलनाचा विचार करतां ज्यांना परदेशांत भांडवल मिळूं शकेल किंवा ज्या विशिष्ट देशाहून आयात करावयाची आहे त्या देशाशीं पत किंवा पैशाचे व्यवहार करण्याची व्यवस्था सरकारकडे आहे अशा प्रकरणीं भांडवली मालाची आयात करण्यासाठी परवाने मिळण्याची शक्यता आहे.

---

### इंडियन बँक्स असोसिएशनचे नवे पदाधिकारी

इंडियन बँक्स असोसिएशनची १३ वी वार्षिक सभा दि. १८ रोजीं भरून पुढीलप्रमाणें पदाधिकाऱ्यांची फेर निवडणूक झाली. श्री. सी. एच. भाभा (सेंट्रल बँक ऑफ इंडिया) चेअरमन, श्री. एन. एम. चोक्सी (बँक ऑफ बरोडा) डेप्युटी चेअरमन, श्री. एस. एल. कोठारी (स्टेट बँक ऑफ जयपूर) ऑनररी सेक्रेटरी.

#### कमिटीचे इतर सभासद

श्री. टी. आर लालवाणी (बँक ऑफ इंडिया), श्री. एम. आर. रुइया (युनायटेड कमर्शिअल बँक), श्री. कमलनयन बजाज (पंजाब नॅशनल बँक), श्री. कृष्णस्वामी अय्यंगार (दि इंडियन बँक), श्री. संजीवन बानर्जी (युनायटेड बँक ऑफ इंडिया), श्री. पी. व्ही. गांधी (देवकरण नानजी बँकिंग कं.), श्री. एफ. के. एफ. नरिमन (युनियन बँक ऑफ इंडिया), श्री. एन. के. करंजिया (सेंट्रल बँक ऑफ इंडिया), श्री. सी. एकनाथ कामत (कॅनरा बँक).

५०
वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें — गुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —




माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, ता. १० मार्च, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अणुशक्तीच्या विकासांतील भारताचें स्थान

भारताच्या अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं भारतांत अणुशक्तीच्या विकासासाठी जे प्रयत्न करण्यांत येत आहेत, त्यासंबंधींची माहिती लोकसभेच्या सर्वपक्षीय सल्लागार समितीला निवेदन केली आहे. ह्यासंबंधीं बोलतांना डॉ. भाभा म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत अणुशक्तीच्या विकासासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत यावी, अशी सूचना अणुशक्ति विकास मंडळानें नियोजन समितीला केली आहे. अणुशक्तीचा विकास करण्याच्या कामांत भारत आज तरी चीनच्या पुढें आहे. चीनमध्यें अणुशास्त्राची जी प्रगति झाली आहे, तीवरून रशिआच्या मदतीखेरीज चीनला अणुबॉंब तयार करतां येईल अगर त्याचा स्फोट करतां येईल असें वाटत नाहीं; आणि रशिआ अशा प्रकारची मदत देण्याचा संभव फारच कमी दिसतो. आज ब्रिटन व फ्रान्स ह्यांची अणुशास्त्राच्या बाबतींत जितकी प्रगति झालेली आहे, तितकीच जवळ जवळ प्रगति भारताची झालेली आहे. तथापि अणुशक्तीचा उपयोग विध्वंसक कामासाठी करावयाचा नाहीं असें भारताचें कायमचें धोरण आहे. आशिआंतील देशांचा विचार करतां फक्त जपान एवढें एकच राष्ट्र अणुशक्तीच्या शास्त्राबाबत भारताच्या थोडेसें पुढें आहे. मुंबईजवळील ट्रॉम्बेमधील दोन अणुभट्ट्या चालू झाल्या म्हणजे ही थोडीशी आघाडीहि कमी होईल. अणुशक्तीचा उपयोग करून वीज उत्पन्न करण्याचे प्रयत्न भारत करीत आहे. मुंबई–अहमदाबाद विभागांत स्थापन करण्यांत येणारें अशा प्रकारचे पहिलें केंद्र १९६५–६६ च्या सुमारास पूर्ण करण्यांत येईल अशी आशा करावयास पुष्कळच जागा आहे. हा कारखाना स्थापन करण्यासाठी ५१ कोटी रुपये खर्च करावे लागतील. ह्या रकमेंत परदेशीय चलनाच्या स्वरूपांतील खर्चाचाहि समावेश आहे. अणुशक्तीच्या ह्या वीजकेंद्रांत अणुशक्तीच्या दोन भट्ट्या असतील व त्यांतील प्रत्येक भट्टी १,५०,००० किलोवॅट वीज निर्माण करूं शकेल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत प्रत्येकी १,५०,००० किलोवॅट वीज निर्माण करणाऱ्या आणखी दोन वीज–उत्पादन केंद्रांचा समावेश करण्यांत येणार आहे. पण अजून ह्यासंबंधीं निर्णय घेण्यांत आलेला नाहीं.

अणुशक्तीवर चालणारीं वीजकेंद्रें निर्माण करण्याच्या कामीं रशिआनें मदत देऊं केलेली आहे. केंद्राची तपासणी करण्याचा व त्यावर आपलें नियंत्रण ठेवण्याचा हक्क सोडून देण्याची तयारीहि रशिआनें दाखविलेली आहे. अणुशक्तीचा विकास करण्याच्या कामांत एका देशानें दुसऱ्या देशाला मदत केलेली असेल तर मदत देणाऱ्या देशाला वरील हक्क आंतरराष्ट्रीय अणुशक्ति कमिशनच्या नियमानें प्राप्त होतो. अमेरिकेनेंहि ह्या बाबतींत मदत करण्याची तयारी दाखविली होती. अलीकडे राजस्थानांत अणुशक्तीचें वीज–केंद्र उभारण्यासंबंधीं मागणी करण्यांत आली आहे. अशा प्रकारचें एखादें छोटेसें केंद्र उभारणें राजस्थानच्या दृष्टीनें सोयीचें होईल. मोठ्या केंद्राचा मात्र त्याला तितकासा उपयोग होणार नाहीं. अशीं छोटीं केंद्रें उभारतां येणें कितपत शक्य होईल ह्यासंबंधीं नियोजन–समिति आणि भारताचे अणुशक्ति मंडळ ह्यांचा विचारविनिमय चालू आहे. अणुशक्ति-विकासासाठी मागितलेली २०० कोटी रुपयांची रक्कम मिळाली तर संशोधनाचें कार्य करण्यासाठी दोन छोटीं केंद्रें उभारण्याची शक्यता आहे. पण हीं केंद्रें विद्यापीठांच्या अखत्यारींत मात्र ठेवण्यांत येणार नाहींत. कारण, अणुशक्ति–केंद्रांत अपघात होण्याची शक्यता असते.

---

## महाराष्ट्र राज्याचें स्वरूप

बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या सभेंत भाषण करतांना मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनीं महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक स्वरूपाची थोडक्यांत कल्पना दिली. ते म्हणाले कीं, भारतांतील राज्यांत महाराष्ट्र हें राज्य क्षेत्रफळ आणि लोकसंख्या ह्या दोन्ही दृष्टींनीं तिसऱ्या अनुक्रमाचें राज्य होईल. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें लोकसंख्या ३·२० कोटी असून त्यांपैकी २८·९२% लोक शहरांत राहतात. ६३·८८% लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे, आणि ३६·०२ लोकांची इतर व्यवसायावर अवलंबून आहे. ५८% क्षेत्र लागवडीस योग्य आहे; परंतु फक्त ५·६% क्षेत्रास पाणीपुरवठा होऊं शकतो. त्यामुळें दरमाणशीं दरदिवशीं उपलब्ध धान्य फक्त १६·६ औंसांपेक्षा जास्त नाहीं. बिगर–धान्य पिकांचे बाबतींत परिस्थिति बरी आहे; भारतांतील २६·१% कपास आणि १७·९% भुइमूग महाराष्ट्रांत होतो. उसाचें पीकहि बरेंच मोठें आहे. विदर्भांत आणि ठाणें व नाशिक जिल्ह्यांत जंगलसंपत्ति मुबलक आहे. प्रत्येक ४०,००० लोकसंख्येस एक बँक कचेरी, अशी सरासरी पडते; परंतु कांहीं ठिकाणीं बँकिंगच्या सोईचा फारच अभाव आहे. कपास कापड, जनरल व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, रसायनें, साखर, वनस्पति, कागद, साबण, इत्यादींच्या कारखान्यांसाठी महाराष्ट्र प्रसिद्ध आहे. दररोज सात लक्ष कामगार कारखान्यांतून काम करतात. सबंध भारताच्या मानानें महाराष्ट्रांत विजेचें उत्पादन व खप दोन्हीं जास्त आहे. म्युनिसिपल हद्दींतील रस्ते वगळले, तर दर १०० चौरस मैलांस १७·५ मैलांचे रस्ते आणि दर १०० चौरस मैलांस २·२ मैलांचे रेल्वेरस्ते, असें प्रमाण पडतें. रेल्वेमार्ग वाढविण्यावर तिसऱ्या योजनेंत विशेष भर दिला जाईल. १९५१ मध्यें २०·९६% प्रजा साक्षर होती; सबंध भारताचें तत्सम प्रमाण १६·६१% होतें.

---

## आतांच ६,५०,००० तिकिटें खपलीं

रोम येथें २५ ऑगस्ट ते ११ सप्टेंबरपर्यंत होणाऱ्या ऑलिंपिक सामन्यांचीं ६,५०,००० तिकिटें आतांच खपलीं आहेत.

### सरकारी कामासाठी स्वदेशी वस्तूंची वाढत्या प्रमाणावर खरेदी

सरकारी कामासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदींत देशांतील छोट्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत तयार होणाऱ्या मालाची खरेदी अधिकाधिक प्रमाणांत करण्यांत येत असून १९५३–५४ मधील ७५ लक्ष रुपयांवरून १९५८–५९ मध्यें ती ४·५० कोटी रुपयांपर्यंत गेली. देशी उद्योगधंद्यांनीं तयार केलेल्या वस्तु वापरण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न करावा असें भारत सरकारचें धोरण आहे. लागणाऱ्या वस्तु भारतांत तयारच होत नसल्या किंवा विकास योजनांच्या तांतडीच्या व अत्यावश्यक गरजा पुऱ्या होण्याची शक्यता नसेल तरच त्यांची आयात करण्यास परवानगी दिली जाते. सरकार किंमती आणि नमुन्याबाबतच्या अटी याबाबत देशी व छोट्या उद्योगधंद्यांना सवलती देत असलें तरी त्या तात्पुरत्या स्वरूपाच्या असून उत्पादनाच्या दर्जांत हळूहळू सुधारणा होत गेली पाहिजे, हें उघड आहे.

---

### गूळ उत्पादन स्पर्धेचे निकाल


मुंबई सरकारच्या १९५८–५९ या वर्षाचा ऊंस विकास योजनेनुसार एकरागणिक सर्वांत जास्त उत्पादन काढल्याबाबतचें पहिलें ८०० रु. चें पारितोषिक श्री. तातोबा सखाराम जाधव, शिये, करवीर तालुका, जिल्हा कोल्हापूर यांना देण्यांत आलें आहे. पाडळी, कोडोली, हातकणंगलें तालुका, जिल्हा कोल्हापूर येथील श्री. डी. बी. भोसले यांना दुसऱ्या क्रमांकाचें ४०० रु. चें पारितोषिक देण्यांत आलें आहे. दोन्हीहि विजेते कोल्हापूर झोनमधील आहेत. श्री. जाधव यांनीं एकरागणिक २४२ बंगाली मण व १७½ शेर गुळाचें उत्पादन काढलें आणि श्री. भोसले यांनीं एकरागणिक २२३ बंगाली मण व ३८½ शेर गुळाचें उत्पादन काढलें.

**लंडन टाइम्सची नवी इमारत**—लंडन टाइम्स आपल्या कचेरीसाठी नवीन इमारत बांधणार आहे. गेलीं कित्येक वर्षें हें वृत्तपत्र ज्या इमारतींत छापण्यांत येत आहे त्याच इमारतीच्या जागेवर नवीन इमारत बांधण्यांत येणार आहे. १९६२ च्या मध्याच्या सुमारास नव्या इमारतीचा मुख्य भाग बांधून पुरा होईल. हें सर्व काम चालू असतां टाइम्सच्या छपाईंत कोणताहि व्यत्यय येणार नाहीं.

**रशिआची भारताला भेट**—दिल्ली येथें नुकत्याच भरविण्यांत आलेल्या जागतिक शेतकी प्रदर्शनांत रशिआनें आपला मंडप खोलला होता. प्रदर्शनासाठी भारतांत आणलेल्या पुष्कळशा वस्तू रशिआनें भारताला भेट म्हणून दिल्या आहेत. त्यांत शेतीचीं अवजारें, गुरें, कोंबड्या, एक नाट्यगृह, इत्यादि आहेत.

**संगीत आणि दुधाचें उत्पादन**—गोठवाड्यांतील दुभत्या जनावरांच्या तबेल्यांत संगीत ऐकविण्याची सोय करण्यांत आली तर जनावरें अधिक दूध देतात असें मत एका संगीत तज्ज्ञानें व्यक्त केलें होतें. ह्या मताचा खरेखोटेपणा पारखण्यासाठी सरकार अधिक माहिती गोळा करीत आहे, असें लोकसभेंत शेतकी-मंत्र्यांनीं सांगितलें.

**अमेरिकन तज्ज्ञांची मदत**—भडोच जिल्ह्यांतील एका गांवीं खनिज तेलाचा शोध करण्यासाठी आणखी एक विहीर खणण्यांत येणार आहे. त्यासाठी अमेरिकन एंजिनिअरांची मदत घेण्यांत आली आहे. अमेरिकेकडून जरूर ती यंत्रसामग्री आली आहे. भडोच जिल्ह्यांत व सुरत जिल्ह्यांत रशिअन तज्ज्ञांच्या साह्यानें तेलाचा शोध करण्याचें काम चालूच आहे.



## पुस्तकें स्वस्त, म्हणून जास्त खपत नाहींत !

### धनिक मराठी पुस्तकें घेत नाहीं;

### मध्यमवर्गीयांना शक्य होत नाहीं.

[ मराठी पुस्तकांचा खप फारच कमी आहे याचें कारण त्यांच्या महाग किंमती होत अशी सामान्य जनांची कल्पना आहे. मुंबईचे एक कल्पक प्रकाशक श्री. परचुरे यांनीं गेल्या वर्षी ' स्वस्त पुस्तक-योजने'चा प्रयोग करून पाहिला आणि तो पूर्णपणें अयशस्वी झाला ! ]

या व्यवसायांत एक गोष्ट मला वारंवार अस्वस्थ करीत असे. आम्ही प्रकाशक मंडळी जास्त नफा मिळविण्याच्या लोभानें पुस्तकांच्या किंमती भरमसाट ठेवतों आणि त्यामुळें मराठी पुस्तकांचा खप मोठ्या प्रमाणांत होऊं शकत नाहीं, असा एक आक्षेप अनेक नामवंत टीकाकार प्रकाशकांविरुद्ध वारंवार घेत असतात. तसेंच साक्षरता वाढत असल्यामुळें पुस्तकांच्या किंमती कमी ठेवल्या तर पुस्तकांचा खप भरपूर होईल असेंहि या टीकाकारांचें मत आहे आणि हा त्यांचा हिशोब तर्कदृष्ट्याहि चटकन् बरोबर वाटतो. उलट आम्हां प्रकाशकांची कैफियत अशी असते कीं पुस्तकें कमी खपतात म्हणूनच त्यांच्या किंमती भरपूर ठेवणें आम्हांला भाग पडतें. एकदम शेंकडों-हजारों रुपये गुंतवून ते फुटकळ पद्धतीनें वसूल करावयाचे असतात. इतकें करून पुस्तक खपलें तर ठीक नाहींतर ते गठ्ठे बेमुदत सांभाळावे लागतात. या व्यवसायांतील नफातोटा हे जरी मर्यादित असले तरी या व्यवसायाचें स्वरूप बेभरंवशी नि सट्टेबाजीचें आहे. बंगाली, हिंदी, गुजराती अशा अन्य भारतीय जास्त खपाच्या भाषेंतील पुस्तकांच्या किंमतीचें प्रमाणाहि पाहिलें तरी मराठी भाषेंतील पुस्तकांच्या किंमती जास्त वाटूं नयेत. मराठी पुस्तकांचा अल्प खप नि पुस्तकांच्या महाग किंमती या विवाद्य प्रकरणाचें वस्तुनिष्ठ उत्तर शोधण्यासाठी १ मार्च १९५९ पासून ' परचुरे प्रकाशन मंदिर ' या संस्थेनें ' स्वस्त पुस्तकयोजना ' चालू केली नि पुस्तकांच्या किंमतीचा नि खपाचा विशेष कांहीं संबंध नाहीं असें उत्तर अनुभवानें मिळाल्यामुळें हा प्रयोग आतां थांबविण्यांत आला आहे.

स्वस्त पुस्तक योजनेचे सुरवातीपासूनच एक व्यावसायिक प्रयोग म्हणूनच मी योजनेकडे पाहात होतों. नि तेंहि वस्तुनिष्ठ उत्तर शोधून काढण्याच्या इराद्यानेंच. नफानुकसानीचा विचार मनांत न आणतां हा प्रयोग एक वर्षभर करून पाहावयाचा संकल्प मी केला होता. पुस्तकाचा वाङ्मयीन दर्जा नि त्याची छपाई यांत कोठेंहि न्यूनता न ठेवतां पुस्तक मात्र स्वस्त किंमतीला द्यावयाचें नि त्यामुळें खप वाढतो का हें पाहावयाचें हा या प्रयोगाचा उद्देश होता. शंभर ते सवाशें पृष्ठांचें पुस्तक नामवंत लेखकाच्या साहित्यानें भरलेलें नि सुबक छपाईनें सजलेलें केवळ एक रुपया किंमतींत देणें ही योजना केवळ माझ्या दृष्टीनें नव्हे तर पुस्तक लिहिलें गेल्यापासून प्रकाशित होईपर्यंतच्या संस्कारांची ज्याला जाणीव आहे अशा तज्ज्ञांच्या दृष्टीनेंहि फार मोठ्या धाडसाची होती; पुस्तक प्रकाशन व्यवसायावर क्रांतिकारक परिणाम घडविणारी होती.

पण पहिला विचार असा होता कीं नामवंत लेखकांच्या बारा कादंबऱ्या ( प्रत्येकीं १०० ते १२५ पृष्ठांची ) एक वर्षांत प्रसिद्ध करावयाच्या नि प्रत्येक कादंबरीची किंमत एक रुपयाच ठेवावयाची. परंतु मर्यादित पृष्ठसंख्येच्या कादंबऱ्या ठरल्या मुदतींत लिहून देणारे नामवंत लेखक मला मिळूं शकले नाहींत; यामुळें सर्वच कादंबऱ्यांची कल्पना सोडून देऊन नाटक नि काव्य सोडून इतर विविध पुस्तकें योजनेंत घेण्याची पाळी माझ्यावर आली.

या बाबतींतील माझा साधा हिशेब असा होता : एका पुस्तकासाठीं (१) लेखकाचें मानधन (२) कागद (३) छपाई (४) मुखपृष्ठ-सजावट (५) बांधणी हा खर्च ठोक असतो. पुस्तकाची जाहिरात, ग्रंथविक्रेत्याचें कमिशन, टपाल-खर्च नि इतर प्रासंगिक खर्च हा कमी-अधिक होणारा असतो. पण हा सारा खर्च जमेस धरून हिशोब केला तर सव्वाशें पृष्ठांच्या एका पुस्तकाच्या एक रुपया किंमतीप्रमाणें पांच हजार प्रती खपल्या तर माझी स्वस्त पुस्तक-योजना यशस्वी होईल.

या स्वस्त पुस्तक-योजनेविषयीं वाचकांना जास्त आकर्षण वाटावें नि त्यांनीं आगाऊ रक्कम द्यावी म्हणून आणखी एक सवलत मी ठेवली होती. वर्षाला या योजनेंत बारा पुस्तकें निघतील, परंतु आगाऊ दहा रुपये देऊन नांवें नोंदविणाऱ्यांस हीं सारीं पुस्तकें दहा रुपयांतच मिळणारीं ही सवलत होती. कमींत कमी पांचशें ग्राहक या सवलतीचा लाभ घेतील अशी माझी अटकळ होती. तसें घडलें असतें तर रु. ५,००० खेळतें भांडवल निर्माण झालें असतें. परंतु वर्तमानपत्रांतून समुल्य नि विनामूल्य प्रसिद्धि, हस्तपत्रकें, पत्रव्यवहार, प्रमुख ठिकाणीं मोठमोठे बोर्ड इत्यादि खटपटी करूनहि या सवलतीचा लाभ घेऊन मला उत्तेजन देणारे अवघे ११६ कृपावंत पुढें आले. यांत व्यक्तीच जास्त आहेत; संस्था कमी.

खर्चाच्या प्रमाणांत किंमत अडीच-तीन रुपये ठेवायला हवी असतांहि ती केवळ स्वस्त पुस्तक-योजनेसाठी एक रुपया ठेवली गेली. इतकी स्वस्त नि सुबक छपाईचीं पुस्तकें वर्षभर पुरवून मी एक धडा शिकलों. ' किंमत कमी म्हणजे खप जास्त ' हें कागदी गणित व्यवहारांत साफ चुकीचें ठरतें. तेव्हां पुस्तक-प्रकाशन हा व्यवसाय म्हणून ज्याला करावयाचा असेल त्यानें व्यावहारिक दृष्टीनेंच तो हाताळला पाहिजे-मग कोणी कांहींहि म्हणो.

ज्या संस्थांनीं, वाचकांनीं यांत हिरीरीनें सहभागी व्हायला हवें होतें ते तर याबाबतींत संपूर्ण उदासीनच दिसून आले. आपल्या मराठी समाजांत अशिक्षित वर्ग संख्येनें मोठा म्हणून त्यांना पुस्तकाचा उपयोग नसतो. श्रीमंत वर्गाला पुस्तकाची गरज नसते. त्यांचे करमणुकीचे मार्ग वेगळे असतात. अर्धशिक्षित, अशिक्षित वर्ग पैसे गाठीला असतील तर ललित वाङ्मयाऐवजी धार्मिक वाङ्मयच, वाचतां येत नसेल तरी दुसऱ्याकडून वाचून घेऊन तें ऐकण्यासाठीं विकत घेतो. त्यामुळें रामायण, महाभारत, ज्ञानेश्वर, तुकाराम वगैरे वाङ्मयाला या वर्गाकडून सतत मागणी राहते. तुम्हीं ललित म्हटलें तर त्यांना कांहीं समजणार नाहीं, परंतु ललित म्हटलेंत तर त्यांना तें लगेच समजतें. आज अनेक वर्षे अशा धार्मिक वाङ्मयाचा खप अव्याहत चालू आहे. अशा तऱ्हेच्या धार्मिक पुस्तकांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत आहेत. आमच्या नवकथा, नवकाव्य प्रसवणाऱ्या लेखकांना या धार्मिक वाङ्मयाच्या खपाची सुतराम् माहिती नसते नि म्हणून एखाद्या पुस्तकाची आवृत्ति पुनःपुन्हा निघण्याचा अपवाद निघाला तर तो कौतुकाचा विषय होतो. लेखक तोऱ्यानें मिरवूं लागतो.

सतत भावभक्तीनें धार्मिक ग्रंथ विकत घेणारा हा वाचकवर्ग महाराष्ट्रभर पसरलेला, मोठा असला तरी तो ललितवाङ्मयाच्या वाटेला कधींच जात नसल्यामुळें महाग किंवा स्वस्त योजनेच्या दृष्टीनें त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं. धनिक वर्ग हा

पुस्तकें क्वचितच विकत घेतो. या वर्गांत इंग्रजी ग्रंथ मोठ्या प्रमाणांत विकत घेतले जातात असें बोललें जातें. मराठी ग्रंथांना स्पर्श करणें त्यांना कमीपणाचें, अडाणीपणाचें वाटत असतें कीं काय न जाणे! निरनिराळीं कुत्रीं विकत घेणें किंवा निरनिराळ्या चैनीच्या महागड्या वस्तूंचें संग्रहालय घरांत बनविणें हाच आपला 'धर्म' त्यांना वाटतो. पण रुपया दोन रुपये पुस्तकासाठी खर्च करणें त्यांना 'पाप' वाटत असावें. अनेक श्रीमंत, ख्यातनाम, उदार म्हणून कीर्ति असलेल्या लोकांना मी स्वतः भेटलों आहें. सुरुवातीचे नमस्कारचमत्कार झाल्यावर पुस्तकांचा विषय काढताच 'तूर्त मी फार कामांत आहें' या ठराविक सबबींवर माझी अनेक ठिकाणीं बोळवण झाली आहे. कांहीं ठिकाणीं पुस्तकें पाहण्यासाठी ठेवून घेऊन आणि नंतर दोन तीन महिने मला खेटे घालायला लावून अखेरीस पुस्तकें परत केल्याचाहि अनुभव आहे. अशापैकी एका ठिकाणचा अनुभव फारच गमतीचा आहे. पुस्तकें नापसंत असण्याचें कारण काय तर म्हणे— "आमच्या घरांतील सर्व मंडळींनीं पुस्तकं वाचून पाहिलीं पण कुणालाच तीं आवडलीं नाहींत." या अवधींत घरांतील सर्व मंडळींनीं पुस्तकें हाताळल्यामुळें तीं खराब होऊन माझ्याकडे परत आलीं हें ओघानेंच आलें. सौजन्यमूर्ति म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका महाराष्ट्रीय सधन स्त्रीनें तर नोकराकरवीं मला स्पष्ट कळविलें, "आमचा कुत्रा तुमचीं पुस्तकं खराब करील तेव्हां तीं ताबडतोब घेऊन चला!" श्रीमंत लोकांचा पुस्तकांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच इतका विकृत आहे कीं, कांहीं अपवाद सोडल्यास या मंडळींकडून पुस्तक-व्यवसायाला पाठिंबा मिळण्याची अपेक्षा करणें चुकीचें आहे. निदान माझा अनुभव तरी असा आहे.

शाळा, कॉलेजें, वाचनालयें, हाच आम्हां प्रकाशकांचा खरा आधार आहे. मध्यमवर्गांत पुस्तकें विकत घेण्याची इच्छा, हौस आहे. हा मध्यमवर्ग प्रामुख्यानें शहरांत विखुरलेला आहे. या वर्गाची आर्थिक ऐपत मर्यादित आहे. मर्यादित ऐपत, खाणारीं तोंडें फार, वाढती महागाई, विकत घेतलेलीं पुस्तकें सुव्यवस्थित ठेवण्यास लागणाऱ्या जागेचा अभाव नि घरांत ठेवलेलीं पुस्तकें मागून नेऊन नंतर तीं परत न करणाऱ्या मित्रांची भीड या नि इतर कारणांनीं या मध्यमवर्गीय लोकांची इच्छा असूनहि त्यांना पुस्तकें विकत घेणें दिवसेंदिवस जड जाऊं लागलें आहे. त्यापेक्षां ग्रंथसंग्रहालय किंवा भाड्यानें वाचावयास देणारीं दुकानें यांच्यावरच मध्यमवर्ग वाचनाची हौस भागवीत आहे.

साहित्य आणि जीवन यांचा निकटचा संबंध आहे असें विद्वान् लोक खुशाल सांगोत, पण व्यवहारांत जीवनाला साहित्याची कांहीं आवश्यकता आहे असें अनुभवानें वाटत नाहीं. नि म्हणूनच शालोपयोगी पुस्तकांपलीकडे ललित पुस्तकांना मोठा खप मिळणें कठीण जातें—मग तीं पुस्तकें महाग असोत किंवा स्वस्त असोत. शहरें सोडून महाराष्ट्रभर तुरळकपणें विखुरलेल्या ग्राहकापर्यंत पोंचण्यासाठी पोस्ट हाच एकमेव मार्ग आहे. साध्या बुकपोस्टानें पाठविलेलें पुस्तक ग्राहकाला मिळेलच असा विश्वास नाहीं. रजिस्टरनें पाठविण्यास एक रुपयाच्या पुस्तकाला चौदा आणे खर्च येतो, मिळून तें परवडत नाहीं. जर यासाठी कांहीं उपाययोजना निघाली तर आणखी कांहीं ग्राहक वाढण्याचा संभव आहे. पण यानेंहि फार मोठा फरक विक्रींत होईल असें वाटत नाहीं.

—ग. पां. परचुरे, मनोहर, मार्च, १९६०


नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

## बेळगांव

(शेड्यूल्ड बँक)

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर



# बँक ऑफ पूना, लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १५,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस: ४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

## नभोवाणीचा ग्रामीण जीवनांत प्रवेश

लेखक:—श्री. त्र्यंबकेश माडगूळकर,

प्रोड्यूसर, रूरल प्रोग्रॅम्स्, आकाशवाणी पुणें.

संध्याकाळ होते. रानामाळांत गेलेली माणसं, गुरं घराकडं परततात. तिसऱ्या प्रहरीं शांत ओकेबोके दिसणारें खेडें, हलूं बोलूं लागतें. गुरांचें हंबरणें, पाखरांचा गोंधळ, बायाबाप्यांनीं कुणाला घातलेल्या ऊंच हांका, हे सगळे आवाज एकमेकांत मिसळून जातात. चुली पेटतात. धुराचे खांब आभाळांत शिरूं लागतात. गुरेंवासरें दावणीला बांधलीं जातात. धारा निघतात. गरम भाकरी, तिखटजाळ कालवण व्हायला थोडा उशीर असतो.

नभोवाणी शेतकरी मंडळाच्या बैठकीची हीच वेळ असते. आठवड्यांतून दोन वारीं म्हणजे मंगळवारीं आणि शुक्रवारीं रेडिओवर खास कार्यक्रम होतात. गांवांतल्या वीस जाणत्या मंडळींनें ते ऐकायचे असतात. त्यावर चर्चा करायची असते. कांहीं निर्णय घ्यायचे असतात. रेडिओवरून सांगितल्यापैकी कांहीं गोष्टी करून पहायच्या असतात.

मंगळवार आला कीं, मंडळाचा सेक्रेटरी आकाशवाणीनें पाठविलेलें कार्यक्रमाचें लहान पुस्तक काढून पाहतो. 'मुरमाड जमिनींतील विहिरींना पाणी कसें वाढेल' हा विषय असतो. मग सेक्रेटरी हा विषय, तारीख, वगैरे माहिती पंचायतीच्या कचेरीसमोर असलेल्या काळया बोर्डावर लिहितो. ही माहिती लोक येतां जातां वाचतात. सभासद आणि बिगर सभासदहि.

बहुधा रेडिओ सेट बसविलेला असतो तो ग्रामपंचायतीच्या कचेरींत. नभोवाणी शेतकरी मंडळाचा सेक्रेटरी हाहि बहुधा ग्रामपंचायतीचा सेक्रेटरी असतो. त्याला लिहायला वाचायला येणं आवश्यक असतं. कारण मंडळाचें कामकाज त्याला पाहावें लागतें. सभासदांची उपस्थिति, रेडिओशीं पत्रव्यवहार करावा लागतो. मंडळाचा अध्यक्ष हा गांवांतला कोणीहि प्रतिष्ठित माणूस असतो.

गांवांत अंधार दाटूं लागतो आणि ग्रामपंचायतीच्या कचेरींत बत्ती पेटते. बैठक घातली जाते आणि सभासद जमूं लागतात. बिगर सभासदांना बंदी नसते. पण त्यांनीं चर्चेत भाग घ्यायचा नाहीं. चर्चा मंडळानेंच करायची. म्हणून मंडळाचे सभासद पुढें बसतात. बाकी मंडळी दाटीवाटीनें मागें बसतात.

बरोबर साडेसात वाजतां नभोवाणी शेतकरी मंडळाचा कार्यक्रम पुणें केंद्रावरून सुरू होतो. या कार्यक्रमांत, शेतकऱ्यांच्या जीवनाशीं निगडित असा विषय असतो. तो सुलभ आणि रंजक होण्यासाठीं संवाद, अनुबोधपट, श्रुतिका, भाषण यांपैकी कोणतातहि अनुरूप घाट वापरला जातो. प्रामुख्यानें शेतकी विषयावरील कार्यक्रमावर भर दिला जातो. शेतकऱ्यांसाठीं सरकारनें आखलेल्या योजना, नवीन लागवडी, बियाणें, खतें या विषयींची माहिती थोडी आगाऊ अशी कालानुरूप दिली जाते. कुठलीहि शेतीविषयक माहिती देतांना, ती हंगामाअगोदर दिली जाते. हे कार्यक्रम ऐकून, कोणी शेतकऱ्यांनीं कांहीं विशेष कार्य केलें तर त्यांच्या मुलाखती ध्वनिक्षेपित केल्या जातात. महिन्यांतून एक वेळ एखाद्या निवडक गांवाची माहिती श्रोत्यांना करून दिली जाते. हा कार्यक्रम त्या त्या फोरम सेंटरच्या गांवीं जाऊन रेकॉर्ड केलेला असतो. गांवानें केलेल्या सर्वांगीण प्रगतीचें चित्र त्यांत दिसावें, असा हेतु असतो. आजवर असे २४ कार्यक्रम पुणें केंद्रानें केले आहेत.

कार्यक्रम चालू असतांना सभासद शांतपणें ऐकत असतात आणि मंडळाचा सेक्रेटरी टिपणें घेत असतो. या टिपणांमुळें, कार्यक्रम संपल्यानंतर त्याला त्यासंबंधीं महत्त्वाचे मुद्दे सभासदांना सांगायचे असतात.

वीस मिनिटांनंतर त्या दिवशीचा विषय संपतो व पुढें आठ मनिटें चालतें शंकासमाधान. गेल्या कार्यक्रमानंतर वेगवेगळया मंडळींनीं कांहीं अडीअडचणी विचारल्या असतील त्यांतील निवडक अडचणींना आकाशवाणीच्या अनाउन्सर उत्तरें देतो. ज्या तज्ज्ञानें मंगळवारचा कार्यक्रम लिहिला असेल त्याच्याकडून हीं उत्तरें मिळवलीं जातात. तीं नेमकी, विश्वसनीय असावींत यांची काळजी घेतली जाते. तज्ज्ञाकडून उत्तरें मिळवून तीं लगेच श्रोत्यांपर्यंत पोंचविण्याचें हें काम फार जोखमीचें असतें. फार थोड्या वेळांत तें करावें लागतें. शेतकी, सहकार, शिक्षण इत्यादि वेगवेगळया खात्यांचें तत्पर साहाय्य या कामीं पुणें रेडिओला मिळतें. हीं उत्तरें संपतात आणि साडेसात वाजतां सुरू झालेला नभोवाणी शेतकरी मंडळासाठीं ध्वनिक्षेपित होणारा रेडिओ कार्यक्रम संपतो. बटन फिरवून रेडिओचें बटन बंद केलें जातें. कारण आतां श्रोत्यांना बोलायचें असतें.

सेक्रेटरी कार्यक्रम काय झाला हें आपल्या सभासदांना सांगतो आणि चर्चेसाठी आवाहन करतो. आकाशवाणी प्रत्येक मंडळाला जी मासिक कार्यक्रमपत्रिका (प्रोग्रॅम गाईड) पाठवते त्यांत एक दोन मुद्दे चर्चेसाठी म्हणून दिलेले असतात. त्या अनुरोधानें चर्चा सुरू होते.

कार्यक्रमानुरूप चर्चा रंगते. 'मुरमाड जमिनींतल्या कमी पाण्याच्या विहिरींना जास्ती पाणी कसें येईल' या कार्यक्रमानंतरच्या चर्चेत अशा विहिरी आपल्या गांवीं कुणाच्या आहेत तें तपासलें जातें. एखादा सभासद आकाशवाणीनें सांगितलेला उपाय करून पहायचा असें ठरवतो. चर्चा पूर्ण झाली की सेक्रेटरी, आकाशवाणीनें पुरविलेला छापील फार्म भरतो आणि अध्यक्षांच्या सहीनें आकाशवाणीकडे पाठवला जातो.

हे फार्म आकाशवाणीकडे आठवड्यांतून दोन वेळां येतात. आजमितीला, मराठी भाषिक अशा सात जिल्ह्यांतून १४० गांवीं नभोवाणी शेतकरी मंडळें आहेत. पुणें, नगर, उत्तर व दक्षिण सातारा, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर असे हे जिल्हे आहेत. आकाशवाणीनें कार्यक्रम द्यावा, गांवोगांवच्या मंडळांनीं तो ऐकावा, त्यांनीं चर्चा करावी. कांहीं गोष्टी प्रत्यक्षांत आणाव्यात. शंका आल्या तर त्या आकाशवाणीला विचाराव्यात. आकाशवाणीनें तज्ज्ञांच्या साहाय्यानें त्या शंकांचें निरसन करावें. हें चक्र गेलीं तीन वर्षें फिरतें आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून खेड्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न चालू आहेत. अनेक साधनें आणि अनेक योजना राबवल्या जात आहेत. अनेक साधनांपैकी एक साधन म्हणजे रेडिओ. आणि अनेक योजनांपैकी एक योजना नभोवाणी शेतकरी मंडळ. १९३५–३६ सालापासून, ग्रामीण विभागांतील श्रोत्यांसाठी खास कार्यक्रम आकाशवाणीच्या वेगवेगळया केंद्रावरून केले जात होते. स्वातंत्र्यानंतर या कार्यक्रमाकडे विशेष लक्ष देण्यांत आलें. आकाशवाणीचा विस्तार वाढला. देशांतील प्रमुख ठिकाणीं आकाशवाणीचीं अठावीस केंद्रें बोलूं लागलीं. या सर्व अठावीस केंद्रांवरून अठेचाळीस बोलीभाषेंतून ग्रामीण श्रोत्यांसाठी विशेष कार्यक्रम प्रसारित होत असतात.

१९५५–५६ सालीं ग्रामीण कार्यक्रमाच्या इतिहासांतील एक नवं पान उघडलं गेलं. युनेस्को या संस्थेच्या सहकार्यानें नभोवाणी

शेतकरी मंडळाची योजना सुरू झाली. ही प्रायोगिक योजना १९५६ च्या पहिल्या सहामाहींत मुंबई राज्यांत अंमलांत आणली गेली. मराठी भाषिक श्रोत्यांसाठी वीस खास कार्यक्रम पुणें केंद्रानें प्रसारित केले. पुणें, नासिक, नगर, उत्तर सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील एकशेंपंचवीस गांवच्या मंडळींनीं हे कार्यक्रम ऐकले. त्यावर चर्चा केली. झालेलें ज्ञान वापरून कांहीं सुधारणा केल्या.

टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेकडून या योजनेचें मूल्यमापन करण्यांत आलें. या मूल्यमापनानंतर असं आढळून आलं कीं ही प्रायोगिक योजना यशस्वी झालेली आहे. खेडुतांना उपयुक्त अशा नव्या ज्ञानाच्या प्रचाराचं साधन म्हणून नभोवाणी शेतकरी मंडळाच्या कार्यक्रमानं आपलं सामर्थ्य अपेक्षेपेक्षा जास्त असल्याचं सिद्ध केलं आहे. कार्यक्रम ऐकण्यापूर्वीचं खेडुताचं ज्ञान आणि कार्यक्रम ऐकल्यानंतरच त्याचं ज्ञान यांतला फरक डोळे दिपवून टाकणारा आहे. ग्रामपंचायतीचं कार्यक्षेत्र आणि गांवकीच्या बैठकीचं कार्यक्षेत्र या दोन्हीमधली जागा या मंडळानं व्यापली आहे. कारण नभोवाणी शेतकरी मंडळाचं स्वरूप पंचायतीपेक्षा कमी बंदिस्त आणि अधिक लवचिक ठरलं आहे.

प्रायोगिक योजनेला असं घवघवीत यश जेव्हां लाभलं तेव्हां हे कार्यक्रम पुणें केंद्रावरून नियमितपणें होऊं लागले. आजतागायत होत आहेत. आणि १७ नोव्हेंबर १९५९ पासून ही योजना भारताच्या सर्व राज्यांतून सुरू झालेली आहे. ८४१ मंडळें सुरू झालेलीं आहेत. देशभर पसरलेलीं आकाशवाणीचीं केंद्रें आतां आपआपल्या प्रादेशिक भाषेंत नभोवाणी शेतकी मंडळाचे कार्यक्रम प्रसारित करीत राहतील. आठवडयांतील प्रत्येक मंगळवारीं नित्याच्या गांवकरी कार्यक्रमांतून तीस मिनिटांचा एक खास कार्यक्रम दिला जाईल. ८४१ मंडळांतील श्रोते तो ऐकतील, चर्चा करतील, ऐकलेल्यापैकीं कांहीं गोष्टी प्रत्यक्षांत आणतील. शंकांचं निरसनं आकाशवाणीकडून करून घेतील. आपल्या कार्यासंबंधीं वेळोवेळीं आकाशवाणीला लिहीत जातील.

भारतीय आकाशवाणीच्या इतिहासांत ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची समजली पाहिजे. एवढ्या मोठ्या प्रमाणांत, एकत्रित असा श्रोतृवर्ग पहिल्यानेंच आकाशवाणी मिळवीत आहे. ग्रामीण श्रोत्यांना उपयुक्त असे कार्यक्रम यापूर्वीहि आकाशवाणीचीं सर्व केंद्रें करीत होतीं. पण तें ऐकण्यासाठीं संघटित श्रोतृमंडळें नव्हतीं. कार्यक्रम किती जणांकडून ऐकले जातात आणि त्याचा शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष जीवनांत काय उपयोग होतो याची तपशीलवार माहिती नेहमीं मिळत राहील अशी कांहीं यंत्रणा आकाशवाणीपाशीं नव्हती. ती आतां निर्माण करण्यांत आली आहे. आकाशवाणीचा आणि ग्रामीण श्रोत्यांचा संबंध आतां केवळ आवाजापुरता राहणार नाहीं. तो अधिक घनिष्ठ आणि प्रत्यक्ष असा होईल.

अलीकडे काळानें विलक्षण गति घेतली आहे. पंचवीस वर्षांपूर्वींचीं खेडीं आज राहिलीं नाहींत. तीं सारखी बदलत आहेत. तरीसुद्धां, ज्ञान, माहिती आणि मनोरंजन यासाठी शहरांत जीं साधनें उपलब्ध आहेत, तीं खेड्यांत नाहींत. पूर्वी या बाबतींत काम करणाऱ्या कांहीं व्यक्ती, संस्था होत्या. पुराणिक, कीर्तनकार, गोसावी ही मंडळी धर्म, नीति, यासंबंधींचें ज्ञान, माहिती खेडुतांना ऐकवीत असत. गारुडी, कोल्हाटी, दरवेशी यांसारखे लोक खेडुतांचें मनोरंजन करीत असत. पण काळाच्या ओघांत या संस्था, व्यक्ती आतां वाहून गेल्या आहेत. बरें, नव्यांनीं अद्याप त्यांची जागा घेतली नाहीं. चित्रपट, वाचनालयें, महाविद्यालयें, व्याख्यानमाला, यांचें लोण अद्याप खेड्यांत पोहोंचलेलें नाहीं. साहजिकच ज्ञान व माहिती देण्यासाठी, मनोरंजन करण्यासाठी रेडिओनें बहुरूपी बनून खेड्यापाड्यांत राहिलें पाहिजे, ही जाणीव भारतीय आकाशवाणीला आहे. नभोवाणी शेतकरी मंडळाची योजना, ही या जाणिवेपोटीं प्रत्यक्षांत आलेली एक उपयुक्त योजना आहे. ग्रामीण विभागाचा विकास घडवून आणण्याच्या कामीं तिचा फार मोठा उपयोग होऊं शकेल.

—"शेतकरी"

---

**हैद्राबाद येथें खेळांचा आखाडा**—हैद्राबाद येथील फत्ते मैदानावर मैदानी खेळासाठी एक आखाडा बांधण्यांत येणार आहे. स्टॅडिअमची रचना मुंबई ब्रेबर्न स्टॅडिअमसारखी ठेवण्यांत येणार असून त्यांत ४०,००० प्रेक्षक बसण्याची सोय होईल. स्टॅडिअम बांधण्यासाठी ३ लाख रु. खर्च येणार आहे. पाहुण्या खेळाडूंसाठी एक अतिथिगृहहि बांधण्यांत येईल.

**अमेरिकेंत येणारे परदेशीय नागरिक**—अमेरिकेंत येऊन स्थायिक होऊं पहाणाऱ्या परदेशीय नागरिकांची संख्या हल्लींच्या दुप्पट करण्यांत यावी, अशी विनंती प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं कॉंग्रेसला केली आहे. सध्या दरसाल १,५४,००० परदेशी नागरिकांना स्थायिक होण्यास परवानगी देण्यांत येते. राजकीय निर्वासितांसाठीं मुख्यतः वरील मागणी करण्यांत आली आहे.

---

महाराष्ट्र राज्याचे आर्थिक अभ्युदयासाठी सिद्ध

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३१,००,००० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १४,६०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १५ कोटींचे वर |

बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत गतवर्षासाठी करपात्र ९ टक्के डिव्हिडंड जाहीर झालें.

संचालक मंडळ:

श्री. वा. पुं. वर्दे [अध्यक्ष] श्री. न. ग. पवार [उपाध्यक्ष]
श्री. धों. कृ. साठे श्री. भा. म. गुप्ते
श्री. फ. दो. पदमजी श्री. म. स. पारखे
रा. ब. म. वा. जांभेकर श्री. वि. सी. शिरगांवकर
श्री. मा. वी. शहा श्री. ज. के. रेगे
श्री. र. भि. चांठिया

—बँकेच्या ५१ शाखा—

आपल्या आर्थिक व्यवहारांत सुलभता आणतात

मुख्य कचेरी बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग,
बी. कॉम., एफ. आय. बी., लंडन.
मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.